# रे.दि.मु.क्र. १७४/२००७ मधील नि.क्र.६२ वरील आदेश

सदर अर्ज वादीने वादपत्रात दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार केलेला आहे.

०२. वादीचे कथन असे की, वादी ही अशिक्षित व अडाणी बाई आहे. प्रस्तुत दावा वाटपाचा आहे. प्रतिवादी क्र.१ वादीची सावत्र आई आहे. प्रतिवादी क्र.१ अन्य ठिकाणी रहात असल्याने ती दि.३०/११/२०१० रोजी मयत झाल्याची माहिती वादीस मिळू शकली नाही. ती मयत झाल्याचे वादीस अलिकडेच समजले. तिला वादी ही एकमेव वारस असल्याने वादीला दावा मिळकतीत संपूर्ण हिस्स्याचा हक्क प्राप्त झाला आहे. त्या अनुषंगाने वादीने वादपत्र सरनामा परिच्छेद क्र.२,३,५,७,८,९,१० आणि १४ मध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मागितलेली आहे. सदर दुरुस्तीने मूळ दाव्याचे स्वरुपात बदल होत नाही. दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.१ मयत झाली आहे. सदर दुरुस्तीमुळे मूळ केसमध्ये फरक पडत नाही.

०३. प्रतिवादी क्र.२ ते ६ यांनी निशाणी ६३ वर म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी वादीची सर्व कथने नाकारली असून सदर दावा वाटपासाठी दाखल केला आहे व दुरुस्तीने मालकी हक्कावरुन कब्जासाठी मागणी केली आहे. त्यामुळे वादी हे मूळ वाटपाचा दावा कब्जासाठी बदलू पहात आहेत. दुरुस्तीमुळे संपूर्ण दाव्याचे स्वरुप बदलत आहे. प्रतिवादी क्र.१ वादीची आई असून देखील तिच्या मृत्युची माहिती वादीस नव्हती हे हास्यास्पद आहे. सदर अर्ज साडे तीन ते चार वर्षांनी दाखल केलेला आहे. तो केवळ दावा प्रलंबित ठेवणेकरीता केला आहे. सदर दाद मुदतीत नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा.

०४. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीचे विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, वादी सदर दुरुस्तीद्वारे

वाटपाचे दाव्याचे स्वरुप बदलून मालकी हक्काने कब्जाच्या दाव्यात परिर्वतीत करु पहात आहेत. त्यामुळे सदर अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. त्यांनी पुढील न्यायनिर्णय दाखल केला आहे.

**रेवजीतू बिल्डर्स आणि डेव्हलपर्स वि. नारायणस्वामी आणि सन्स् व इतर, २००९ एआयआर(एससीडब्ल्यू) ६६४४.**

सदरील न्यायनिर्णयात मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दुरुस्ती अर्ज निकाली काढतेवेळी विचारात घ्यावयाच्या बाबी नमूद केलेल्या आहेत. त्यानुसार मागणी केलेली दुरुस्ती दाव्याचे स्वरुप पूर्णपणे बदलते का? ही बाब देखील विचारात घेणे आवश्यक आहे.

०५. वादीचे विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, प्रस्तुत दावा मुलतः वाटप व स्वतंत्र कब्जाकरीता दाखल केलेला आहे आणि दावा प्रलंबित असताना वादीची सावत्र आई मयत झाल्यामुळे आता तिला दावा मिळकतीत संपूर्ण हिस्सा मिळतो असे वादीचे कथन आहे. त्यामुळे दाव्याचे स्वरुप बदलत नाही. त्यांनी पुढील न्यायनिर्णय दाखल केला.

**श्री. प्रभाकर एक्संबू भंडारी व इतर वि. गोवा राज्य व इतर, २०१३(५) ऑल एमआर ५९४.**

सदर न्यायनिर्णयात मा. उच्च न्यायालय यांनी असे निर्णित केले आहे की, दावा दाखल केलेनंतर झालेल्या घटनेसंदर्भात विनंती समाविष्ट करणारी दुरुस्ती मंजूर करता येते.

०६. प्रस्तुत प्रकरणात दावा प्रलंबित असताना वादीची सावत्र आई मयत झाल्याचे निदर्शनास येते. सदर दावा वाटपाचा असून वादींनी तिला व तिचे आईला

हिस्सा असल्याचे कथन करुन मूळ दाव्यात ७/८ हिस्सा ठरवून वादीचे कब्जातील मिळकत तिचेकडे कायम राहिल अशा रितीने पृथक करुन कब्जेत मिळावा अशी दाद मागितलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत मूळ दावा वाटप व कब्जाकरीता आहे असे स्पष्ट होते. म्हणून वादीची सावत्र आई मयत झालेनंतर दावा मिळकतीचा संपूर्ण हिस्सा वादीस येतो असे कथन करुन कब्जाची मागणी करणारी दुरुस्ती यामुळे दाव्याचे स्वरुप बदलते असे म्हणता येणार नाही. मुलतः प्रस्तुत दावा कब्जासाठी दाखल केलेला होता. त्यामुळे प्रतिवादीची सदर हरकत मान्य करता येणार नाही. परंतु सदर अर्ज दाखल करणेस विलंब झालेला आहे आणि त्यामुळे सदर विलंबाकरीता प्रतिवादींना नुकसान भरपाई मिळणे आवश्यक आहे. माझ्या मते मागणी केलेली दुरुस्ती मिळणेस वादी पात्र आहे आणि सदर दुरुस्तीने पक्षकारांमधील खराखुरा वादातील प्रश्न निर्णित करणेस मदत होणार आहे. सबब वर नमूद कारणांकरीता मी पुढील आदेश पारीत करतो.

## आदेश

अर्ज रु.१०००/- कॉस्ट प्रतिवादींना देण्याचे
अटीवर मंजूर करणेत येतो.

सही/-

दि. १९/०९/२०१४

(म. ता. पाटणकर)
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जयसिंगपूर.